# जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे

आस्थापना शाखा (संकलन 3)

ई-मेल est.dhule@gmail.com दुरध्वनी क्र.02562 - 288711/12/13 फॅक्स क्र.02562-288715

मह शाखा-ब/कक्ष-1/आस्था-3/कावि/ 183 /2026 दिनांक:-14/08/2026

वाचले:-1. इकडील जाहिरात क्र.मह शाखा-ब/कक्ष-1/आस्था-3/कावि/154 /2026 दि. 22/07/2026
2. म. जिल्हाधिकारी धुळे यांचेकडील मंजूर टिपणी दि.13/08/2026

## जाहिरात

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील, शासन निर्णय क्र.ईएसटी-2010/प्र.क्र.42/ई-8 दि. 6 एप्रिल, 2011 व शासन निर्णय क्र.ईएसटी-2010/प्र.क्र.42/ई-8 दि. 30 जुलै, 2011 मधील तरतुदींनुसार, **विधी अधिकारी हे पद कंत्राटी पध्दतीने** एकावेळी 11महिन्यांच्या कालावधीसाठी भरणेकामी पात्र उमेदवारांकडून खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून विहित नमून्यात दि.27/08/2026 पर्यंत कार्यालयीन वेळेत अर्ज मागविण्यात येत आहेत.

**आस्थापना शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे**

| पदनाम | पदसंख्या | मासिक वित्तलब्धी |
|---|---|---|
| विधी अधिकारी **(कंत्राटी)** | 01 | एकत्रित मानधन 45,000/-+ दूरध्वनी व प्रवासखर्च रू.5,000/-असे एकत्रित मानधन रक्कम प्रति महिना या व्यतिरिक्त कोणतेही भत्ते देय होणार नाहीत. (शासन महसुल व वनविभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-2023/प्रक्र.168(E-1027756) ई-8 दि.25 एप्रील 2025) |

**शैक्षणिक अर्हता व अनुभव –**

1. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर व सनदधारक असणे आवश्यक आहे.
2. जाहिरातीच्या दिनांकास या पदासाठी वकीली व्यवसायाचा किमान 7 वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.
3. उमेदवार महसूल विषयक, सेवाविषयक व प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ. बाबत ज्ञान संपन्न असेल, ज्यामुळे कायदे विषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.
4. उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असावे.
5. विधी अधिकारी या पदासाठी उमेदवारांचे वय नियुक्तीच्या वेळी 45 वर्षापेक्षा जास्त नसेल.

**विधी अधिकारी यांची निवड: -**

विधी अधिकारी कंत्राटी यांची निवड जिल्हा निवड समितीच्या अखत्यारीत राहील. तसेच जिल्हाधिकारी हे या कंत्राटी पदासाठीचे नियुक्ती प्राधिकारी असतील.

**विधी अधिकारी यांचे कर्तव्ये व जबाबदाऱ्या: -**

1. कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबीबाबंत/न्यायालयीन प्रकरणे सल्ला देणे व न्यायालयाकडे प्रकरणे हाताळणे.
2. महसुल विषयक /परिच्छेदनिहाय अभिप्राय (Parawise Comments) तयार करणे/ सेवाविषयक /प्रशासकीय बाबी/विभागीय चौकशी इ. तथा समकालीन कादयाची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकाणे हाताळणे.
3. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलांकडे पाठपुरावा करणे. जेथे मा सर्वोच्च न्यायालया मा उच्च न्यायालय व मा जिल्हा व सत्र न्यायालय अथवा इतर कोणत्याही न्यायालयात शासन/जिल्हाधिकारी प्रतिवादी आहे अशा सर्व प्रकरणांत सादर करावयाची परिच्छेदनिहाय अहवाल व प्रतिज्ञापत्र संबंधित अधिकाऱ्याच्या मदतीने तयार करणे.

Scanned with OKEN Scanner

4. शपथपत्राचा मसुदा तयार करणेख् व त्यास सक्षम प्राधिकारी यांची मान्यता घेऊन न्यायालयात विहित मुदतीत सादर होईल याची दक्षता घेणे.
5. जेथे शासकीय विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे, अशा प्रकरणांमध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करून तदनुषंगाने अपिल दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.
6. अपिल प्रकरणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास, अपिलाचा मसुदा तयार करून तो संबंधित सरकारी वकीलाकडे पाठविणे व अपिलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.
7. वेळोवेळी जिल्हाधिकारी/शाखाप्रमुख/ कार्यालयाच्या अधिनस्त इतर क्षेत्रिय अधिकारी यांनी विधी विषयक कामकाजाबाबत व नेमून दिलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे

**नेमणुकीचे स्वरुप:-**

1. महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. ईएसटी-2010/प्रक्र.42/ई-8 दि. 31/07/2011 नुसार विधी अधिकारी यांची निवड जिल्हा समितीच्या अखत्यारीत राहील. तसेच जिल्हाधिकारी हे नियुक्ती प्राधिकारी असतील.
2. विधी अधिकारी हे पद नियमित स्वरुपात नसून 11 महिन्यांकरीता कंत्राटील तत्त्वावर भरण्यात येईल.
3. 11 महिन्यांनतर आवश्यक वाटल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी वाढविता येईल. तथापि अशी मुदत वाढवितांना एकावेळी ही मुदत 11 महिन्यांपेक्षा जास्त असणार नाही याची काळजी नियुक्ती प्राधिकारी घेईल. अशाप्रकारे जास्तीत जात्स 3 वेळा नियुक्ती करता येईल.त्यानंतर अशा उमेदवाराची पुनश्च नियुक्ती करणे आवश्यक आहे असे सक्षम प्राधिकाऱ्याचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुनश्च निवड प्रक्रीयेस सामोरे जावे लागेल.
4. सदर पदाची नेमणूक पुर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल व विधी अधिकारी शासकीय कर्मचारी म्हणून गणला जाणार नाही. व नंतर शासनाव्दारे वेळोवेळी धोरणात्मक निर्णय घेतले गेल्यास, ते विधी अधिकारी यांना बंधनकारक राहील.

**पदभरतीबाबत कार्यक्रम:-**

1. अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक:- दि. 27/08/2026 (सायंकाळी 6.15 वाजेपर्यंत)
2. **खालील प्रकाराचे अर्ज सदोष गणले जातील व त्यांचा विचार करण्यात येणार नाही -**

अ. विहीत पात्रता धारण न करणारे.
आ. मजकूर चुकीचा किंवा अपूर्ण भरलेले अर्ज.
इ. स्वाक्षरी नसलेले अर्ज.
ई. ओळखपत्र म्हणून आधार कार्डची स्वसाक्षांकीत छायांकीत प्रत नसलेला अर्ज.
उ. उमेदवाराचे छायाचित्र (फोटो) स्वाक्षांकित केलेले नसल्यास.
ऊ. एकदा नाकारण्यात आलेल्या अर्जाबाबत पुर्नविचार केला जाणार नाही. त्यासंबंधी कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल जिल्हाधिकारी कार्यालयाकडून घेतली जाणार नाही
ऋ. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांच्या / प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती नसलेले अर्ज.

3. पात्र /अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे :- दि. 04/09/2026
4. प्रसिध्द केलेल्या यादीमधील चुकीबाबत उमेदवारांनी प्रत्यक्ष कार्यालयात समक्ष लेखी अर्ज करण्याची अंतिम तारीख :- 08/09/2026
5. झालेल्या चुकांची दुरुस्ती करून पात्र/ अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे दि. 11/09/2026
6. प्राप्त अर्जांची संख्येनुसार उमेदवारांची प्राविण्य पडताळणीसाठी आवश्यकता लेखी चाचणी अथवा प्रत्यक्ष मुलाखत अथवा दोन्ही घेण्याबाबत जिल्हा निवड समिती निर्णय घेईल.निर्णयाअंती आवश्यक सुचना कार्यालयाचे सुचना फलकावर व संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**आवश्यक सुचना:-**

1. वरील **शैक्षणिक पात्रता व अनुभवांमधील अनुक्रमांक** 1ते 5 बाबतची सर्व कागदपत्रे प्रमाणपत्रांच्या सांक्षांकीत प्रती अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

Scanned with OKEN Scanner

2. सदर जाहिरात व सदर पदाकरीता विहित नमुन्यातील अर्ज, लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र या कार्यालयाचे www.dhule.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
3. उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज अे-4 आकाराच्या कागदावर एका बाजुस टंकलिखीत/संगणकीकृत करून जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती जिल्हाधिकारी कार्यालय धुळे या पत्त्यावर दि. /07/2026 पर्यंत सायंकाळी 6.15 वाजेपर्यंत नोंदणीकृत टपालाने अथवा समक्ष विहित मुदतीत सादर करावे. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
4. उमेदवाराचे अर्जामध्ये दिलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळून आल्यास त्यांचा अर्ज नामंजूर करण्यात येईल.
5. प्राप्त अर्ज संख्येनुसार, उमेदवाराचे प्रविण्यपडताळणीसाठी आावश्यक वाटल्यास, लेखी चाचणी अथवा प्रत्यक्ष मुलाखत तोंडी अथवा दोन्ही घेण्यात येईल. याबाबतची सुचना संकेतस्थळावर तसेच कार्यालयाचे सुचना फलकावर लावुन फलकावर करण्यात येईल.
6. अंतिम निवड झालेल्या उमेदवाराचे नाव यथावकाश कार्यालयाचे सुचना फलकावर तसेच संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.
7. निवड झालेल्या उमेदवाराने विहित नमून्यातील करारनामा करून देणे बंधनकारक आहे. करारनामा करून दिल्यानंतर निवड झालेल्या उमेदवारास कंत्राटी पध्दतीने नेमणूकीकरीता असल्याचे आदेश देण्यात येईल.
8. कंत्राटी पध्दतीने विधी अधकारी या पदावर नेमणूक झालेल्या उमेदवारास त्याचे नेमणूकीचे पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडणे आवश्यक आहे.
9. या प्रक्रीयेमध्ये बदल करण्याचा/स्थगित /रद्द करण्याचा अधिकारी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती धुळे यांना राहील.

**इतर आवश्यक अटी:-**

1. विधी अधिकारी कंत्राटी या पदाकरीता अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारावर फौजदारी गुन्हा तसेच कोणत्याही संबंधात गुन्हा नोंद नसावा.
2. करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना एकत्रित मानधन आणि अनुज्ञेय दुरध्वनी व प्रवास खर्च याव्यतिरिक्त कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.
3. या निवड प्रक्रीयेमार्फत निवड झालेल्या उमेदवारांना या निवडीच्या आधारावर भविष्यात स्थायी शासन सेवेत समावुन घेण्याचा अधिकार राहणार नाही व त्याबाबतचे कोणतेही विनंती अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.
4. विधी अधिकारी यांचे काम असमाधानकारक असल्याचे निष्पन्न झाल्यास किंवा त्याचे विरुध्द तक्रार प्राप्त झाल्यास, त्यांना कोणतीही पुर्वसुचना न देता त्यांची तात्पुरत्या स्वरुपातील नेमणूक रद्द करण्यात येईल.
5. विधी अधिकारी म्हणून निवड झाल्यानंतर इतर खाजगी कामे करता येणार नाहीत.

सदर पदासाठी पात्र उमेदवारांची मुलाखत घेण्यात येईल.त्याबाबत पात्र उमेदवारांना मुलाखतीचा दिनांक व वेळ स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

मा जिल्हाधिकारी धुळे
यांचे मान्यतेने

ठिकाण - धुळे
दिनांक - /08/2026

(शरद पवार)
**सदस्य सचिव**
**जिल्हा निवड समिती**
**तथा निवासी उपजिल्हाधिकारी,धुळे**

Scanned with OKEN Scanner